महाराष्ट्र शासन

# इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपुर

सेंट्रलएव्हेन्युरोड,रेल्वेस्टेशनजवळ,नागपुर -४४००१८
फॅक्स क्रमांक ०७१२-२७८०२८
कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७१२-२८२०२००
वेबसाईट -: igmc.org
ई मेल आय डी क्रमांक -: igmcn@rediffmail.com

जा.व.क्रमांक,इंगांशावैम/आस्था १४२/जाहिरात/ 1462-65/२०२५ दिनांक 7 / ०७/२०२५

## -: जाहिरात :-

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर या आस्थापनेवरील सहायक प्राध्यापक व इतर वर्ग-ब यांचे रिक्त पदे स्थानिक निवड मंडळाद्वारे तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसासाठी उमेदवारांकडून भरण्यास पृथक अर्ज मागविण्यात येत आहे. अर्जाचे कोरे नमुने दिनांक ०९.०७.२०२५ ते दिनांक १५.०७.२०२५ पर्यत वेळ १०.३० ते ५.०० पर्यत अधिष्ठाता कार्यालय, आस्थापना विभाग वर्ग-०२ येथे उपलब्ध आहे. ऑफलाईन अर्ज दिनांक १६.०७.२०२५ रोजी ०२.०० पर्यत स्विकारण्यात येतील. सदर पदासाठी मुलाखती २२.०७.२०२५ रोजी ठिक ०१.०० वाजता अधिष्ठाता,कार्यालय यांचे दालनात ठेवण्यात आली आहे. अधिक माहितीकरीता सदर जाहिरात महाविद्यालयाच्या igmc.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | विभाग | रिक्त पद | रिक्त पदांची संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | शरीररचनाशास्त्र | सहायक प्राध्यापक | १ | As per notification 14/02/2022 & 30/06/2025<br>I) Postgraduate degree MD/MS/DNB in concern subject.<br>II) Experience of Senior Resident or tutor of 1 yrear in the concerned subject in a recognized medical College /institution.<br>III) Should have completed or required to undergo the basics course in biomedical research<br>IV) Should have completed or required to undergo Basic course in Medical Education Technology from institutions designated by NMC. |
| २ | शरीरक्रियाशास्त्र | | १ | |
| ३ | जीवरसायनशास्त्र | | ३ | |
| ४ | न्यायवैद्यकशास्त्र | | १ | |
| ५ | विकृतीशास्त्र | | १ | |
| ६ | जनऔषधवैद्यकशास्त्र | वैद्यकीय अधिकारी | १ | M.B.B.S. |
| | एकुण पदे | | ८ | |

अधिष्ठाता,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपुर.

## नियम व अटी -:

०१) वेतनश्रेणी -: सहायक प्राध्यापक यांना दिनांक ३१.१२.२०२० च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख रुपये फक्त) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहिल. तसेच विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी यांना दरमहा रु. ८५,०००/- ठोक मानधन अनुज्ञेय राहिल. सदरील वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मुळ अनुदानातून १० कंत्राटी सेवा या उदिष्टामधून भागविण्यात येईल.

०२) वयोमर्यादा -: सेवाप्रवेश नियमानुसार वयोमर्यादा खुल्या प्रवर्गाकरीता ३८ वर्ष व मागास प्रवर्गाकरिता ४३ वर्ष राहिल. उमेदवार मागास प्रवर्गात असेल तर जात व जातवैधता प्रमाणपत्र आश्यक राहिल. व आवश्यक असल्यास NCL प्रमाणपत्र सादर करावे.

०३) गुणवत्ता -: राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या मानकाची पुर्तता करण्याकरीता वरील पदाकरीता वरीष्ठ निवासी किंवा टयुटर पदाचा किमान ०१ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक राहिल.

०४) एमडी/एमएस किंवा एमबीबीएस अभ्यासक्रम या संस्थेतून पास केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. उमेदवार जर या संस्थेतून पास झाला नसल्यास महाराष्ट्रातील इतर शासकीय संस्थेतून पास झाला असल्यास त्यास प्राध्यान्य देण्यात येईल. महाराष्ट्रातील इतर शासकीय संस्थेतून पास झालेला उमेदवार उपलब्ध नसल्यास खाजगी संस्थेतून किंवा इतर राज्यातून आलेला विद्यार्थ्यांना विभागाची निकड लक्षात घेता प्राध्यान्य देण्यात येईल.

०५) सहायक प्राध्यापक पदाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

०६) मेरिट गुण पीजी आणि युजी नुसार प्राध्यान्य देण्यात येईल तसेच शोधनिबंध, राज्य व अखिल भारतीय स्तरावरील परिषदेतील सहभाग याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

०७) सदर तात्पुरती नियुक्ती हि महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा इतर संस्थेतुन बदलीने उमेदवार रुजु होईपर्यंत किंवा संचालनालया मार्फत बंधपत्रित उमेदवार म्हणुन तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीने रुजु होईपर्यंत किंवा शासन स्तरावरील निवड मंडळा मार्फत नियुक्तीने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा विभागातील पदे कमी झाल्यास जे आधी घडेल तोपर्यंत राहिल.

०८) निवड करण्यात आलेला उमेदवार कार्यरत असतांना सतत जास्त कालावधी गैरहजर असल्यास किंवा काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

०९) मुलाखतीस उपस्थित राहण्याकरीता कोणताही प्रकारचा प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही, तसेच मुलाखतीस उपस्थित राहण्याकरीता या कार्यालयामार्फत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

१०) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियतून बाद करण्यात येईल.

११) सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाही व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील.

१२) संस्थेत तात्पुरत्या सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांनी अर्ज विभागप्रमुखा मार्फत सादर करण्यात यावे.

१३) वरील जाहिरात मधील सहायक प्राध्यापक या पदांची निवड वैद्यकीय शिक्षण मंडळाच्या मान्यतेच्या अधिन राहुन करण्यात येईल.

१४) उमेदवार या महाविद्यालया व्यतिरीक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे व त्या ठिकाणी राष्ट्रीय वैद्यक परिषदेच्या निरीक्षणात सहभाग नोंदविला असल्यास तसे अर्जात नमूद करण्यात यावे.

१५) सदर पदाकरीता उमेदावांची नियुक्ती निव्वळ ३६४ दिवसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर राहिल. ३६४ दिवसानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देवून पुन्हा ३६४ दिवसासाठी पुनर्नियुक्तीबाबतचा प्रस्ताव मा. आयुक्त,वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना सादर करण्यात येईल.

१६) अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या छायाप्रति साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतेही कागदपत्रे स्विकारले जाणार नाही.

**आवश्यक कागदपत्रे** -: अ) प्रथम, व्दितीय व तृतीय वर्ष एमबीबीएस तसेच एमडी/एमएस किंवा समतुल्य या सर्व परिक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे (ब) सर्व पदवी पदवीका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतीम वर्षाची गुणपत्रिका (क) एम.एस.सी. तसेच एम.सी.आय. नुतणीकरण केलेले नोंदणी प्रमाणपत्र (ड) जातीचे प्रमाणपत्र व जात व जात वैधता प्रमाणपत्र/NLC (लागू असल्यास) (ई) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडलाचा दाखला (फ) एक वर्ष वरीष्ठ निवासी पदाचे अनुभव प्रमाणपत्र (ग) पॅनकार्ड व आधार कार्डची छायाप्रत इ. कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. (ह) अनुभव प्रमाणपत्र (इ) बीसीबीआर चे प्रमाणपत्र (ज) Basic Course in Medical Education Technology चे प्रमाणपत्र (ल) शोधनिबंध व इतर प्रमाणपत्र.

**-: सदर जाहिरात या महाविद्यालयाच्या iggmc.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

अधिष्ठाता,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपुर.

प्रति -:

मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई माहितीकरीता सविनय सादर.
सबंधित प्राध्यापक व विभाग प्रमुख,इंगांशावैम,नागपूर.
सर्व अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालये यांना माहितीकरीता सविनय सादर.
नोटीस बोर्ड करीता, इंगांशावैम,नागपूर.